वर्ष १० वे विशेष अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि.३ डिसेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

काय ते निवडणुक विभाग आणि काय ती निवडणूक

राडेबाजी, पैशांचा महापूर, बोगस आयडीकार्ड, खरे मतदारांचे मतदान दुसरेच करून गेले ही कसली निवडणूक

मतदारांनो, तुम्हाला लाज वाटायला पाहिजे स्वतःच्या हक्काचे मत २-५ हजारात खुलेआम तुम्ही विकलेत, आता निवडणुन येणाऱ्या उमेदवारांसमोर तुम्ही तुमचे काम कोणत्या तोंडाणी घेवून त्यांच्याकडे जाणार ?

दोन दिवस कचून पैसे वाटप होत होते, निवडणूक विभाग अन् पोलीस प्रशासन काय झोपा घेत होते की काय?

Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

हे प्रकरण एखाद्या तमाशालाही बदनाम करण्यापेक्षा जास्त आहे

प्रत्येक बुथवर खुलेआम, बिनधास्तपणे सकाळी ७ वाजल्यापासूनच बोगस मतदानाला सुरूवात झाली होती....!

कालच्या झालेल्या निवडणुकीत काही पैशांवाल्यांनी गुंडागर्दीचा शिमगा केला

कालची झालेली तुफान राडेबाजीमुळे निवडणुक आयोग नापास तर झाले नाही ना?

कार्यकर्ते खुलेआम पैसे घेत असतील आणि खुलेआम मतांचा भाव ठरविला जात असेल याच्यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट कोणती?

निवडणूक विभागाचा कारभार म्हणजे कोणाला कोणाचाही धाक नाही

ज्या उमेदवारांनी जीतोड मेहनत केली प्रत्येकाच्या सुख दुःखात सामील झाले, प्रभागाचा भरभरून विकास केला, पाणी दिले, रस्ते दिले, स्वच्छता केली, विद्युतचे प्रश्न निकाली काढले, घरकुल मिळवून दिले एवढे करूनही त्यांना निवडणुकीत मतदारांना पैसेच वाटप करायची वेळ येते पुढे हे लोक तुमचे काम कशाला आणि का मदत करतील?

लोकशाहीच्या निवडणुक प्रक्रियेचा बाजार म्हणता येईल का?

राजकारण आणि निवडणूक आता व्यवसाय झाला आहे का?

मतदानाच्या दिवशी आलेला पैशांचा महापुर सापडलेल्या पैशांची बंडलं, अनेकांच्या बोकांडी बसून,कोचून घेणारी कार्यकर्ते आणि मतदार

कालच्या झालेल्या निवडणुकीत जो धिंगाना कार्यकर्त्यांनी घातला त्याला निवडणुक विभाग जबाबदार आहे का?

मोठ मोठ्या गप्पा मारणाऱ्या निवडणूक विभागाने ही डोळे झाकून पाहिले, कशाचे भयमुक्तीच्या गप्पा मारताय आपण

बीड, (दिव्य न्युज):- कालच्या निवडणुकीने खरोखरच मानखाली करायल लावली. खुलेआम सर्वच पक्षाच्या उमेदवांकडून बेशुमार पैशांचे वाटप होत होते. काही मोचक्या मतदारांना सोडून इतर मतदार मात्र उमेदवारांच्या घरांसमोर कार्यालयासमोर बिंनाधास्तपणे पैशांसाठी रांग लावतांना दिसून आले. प्रत्येक मतदारांच्या हाती आपल्या कुटूंबियाच्या मतदारांच्या चिठ्ठ्या होत्या. ते उमेदवारांना दाखवत होते की आमच्याकडे एवढे मतदार आहेत. कोणी उमेदवार एका मताला २००० तर कोणी ३००० तर कोणी ५००० देत होते. अक्षरशः ५०० रूपयांच्या नोटाचा महापुरच बीडमध्यें दिसून आला. सत्ताधाऱ्यांच्या काही उमेदवारांनी एकाकडून चिठ्ठी द्याची आणि ति चिठ्ठी दिलेल्या ठिकाणावरून जावून दाखवायची तिथे त्यांच्या चिठ्ठीवर दिलेली रक्कम मोजून देण्यात येत होती. त्या ठिकाणी पैशांचे पोतेच भरलेले होते. एका मारवाडी अन् हॉटेल असलेल्या, कॉलेज अन् हॉटेलमध्ये तर रिग लावुन पैसे वाटप होत होते. जशी रांग एखाद्या स्वस्त धान्याच्या दुकानावर असते. मतदारांनो तुम्हाला थोडी तरी लाज कशी वाटली नाही. आपले हक्काचे आणि स्वतःचे मत तुम्ही खुले आम बोली लावून विकले. खरोखरच किव येते.... तुम्ही आता त्या निवडून येणाऱ्या उमेदवारांच्या दारात आपले काम कोणत्या तोंडांनी घेवून जाणार. तुम्हाला आता काहीच हक्क शिल्लक राहिलेला नाही. तुम्ही कोणत्या तोंडांनी आता सांगणार कारण तो आलेला उमेदवार कचा कच ५०० रूपयांच्या हिरव्या गार नोटा वाटून निवडून आला आहे. आता भोगत बसा तुमच्या प्रभागाचा विकास..... हा तर लांबच राहिला ते निवडून आलेला उमेदवार तुमचे पाच वर्षे तोड पहायला सुध्दा येणार नाही.... अनेक पक्षाच्या नेत्यांनी स्वतःच्या पक्षाचा उमेदवार निवडून यावा यासाठी इतर लहान सहान पक्षाच्या आणि अपक्ष उमेदवारांनाही पैसे वाटप करून आपल्या समोरच्या उमेदवारांना मते मिळू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पैशांची उधळपट्टी करण्यात येत होती. प्रत्येक मतदान केंद्रावर बोगस मतदानाचे प्रकार एवढे वाढले होते की हे बघून डोके घर घर फिरत होते.... प्रत्येक उमेदवारांनी चालाकी करून आपली अक्कल लढवून प्रथम : तर आपल्या प्रभागातील ज्या मतदारांचे

▸▸ पान २ वर

पंडित-पवार नातेवाईक, पण राजकारणाने त्यांना एकमेकांच्याविरोधात भिडवले!

मुंबई , (दिव्य न्युज):- राजकारण नात्यागोत्याचं अन् संघर्षाच असे चित्र नहेमीच पहायला मिळते. महाराष्ट्राच्या राजकारणातील घराणेशाही आणि नात्याच्या नेत्यांमधील टोकाचे वाद याची असंख्य उदाहरणं आहेत.याच पठडीत बसणारे दोन राजकीय घराणे म्हणजे बीड जिल्ह्यातील गेवराईचे पंडित आणि पवार कुटुंब. एकमेकांचे नातेवाईक असलेल्या या घराण्यांमध्ये राजकारणामुळेच आता विस्तवही जात नाही. नगरपालिका निवडणुकीचे मतदान सुरू असतानाच जो प्रकार गेवराईत घडला हे त्याचे ताजे उदाहरण ठरते.

काही काळ नात्या - गोत्यांमुळी थंडावलेले पंडितांचे राजकीय युद्ध मागच्या १२वर्षांपासून पुन्हा सुरु आहे. आता नगरपालिका निवडणुकीत (एश्रशलींळेप) पंडितांच्या घरातील कोणी उमेदवार नसला, तरी पंडित-पवार पुन्हा आमने सामने आहेत. आज नगर पालिका मतदानाच्या दिवशीच पंडित-पवारांमध्ये संघर्ष भडकला. वाहनांची तोडफोड, दगडफेक आणि एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याच्या प्रकाराने सकाळी गेवराईत तणाव होता.याची सुरुवात अगोदर आतेभाऊ-मामेभाऊ पृथ्वीराज पंडित व शिवराज पवार यांच्या भांडणाने झाली. या भांडणानंतर माजी आमदार अमरसिंह पंडितयांचे स्वीय्य सहाय्यक अमृत डावकर यांच्यासोबत बाळराजे पवार यांनी अरेरवारी केली. अमृत डावकर देखील पंडितांच्या नात्यातले म्हणजे पवारांचेही नातेवाईकच आहेत. त्यांच्यासोबत अनुचित प्रकार घडल्याने जयसिंग पंडित व त्यांचे पुत्र पृथ्वीराज पंडित चांगलेच संतापले.

दोघेही बापलेक हातात हात घालून थेट मेहुणे माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरावर धडकले. यावेळी जयसिंग पंडित व लक्ष्मण पवार हे दोघेही मेहुणे एकमेकांवर धावून गेले. या ठिकाणीही वाहनांची तोडफोड झाली. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत ताफ्यासह गेवराईत पोचल्यानंतर हा तणाव निवळला. त्यानंतर मतदान शांततेत पार पडले.बीड जिल्ह्यातील बीडसह गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई आणि धारुर नगर पालिकांच्या निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. गेवराईत रंगतदार निवडणुक होत आहे. येथे भाजपकडून माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या भावजय व बाळराजे पवार यांच्या पत्नी गिता पवार तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून शितल दाभाडे रिंगणात आहेत. या ठिकाणी पंडित व पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. १८ वर्षांची पवारांची पालिकेवरील सत्ता उलथवण्यासाठी पंडितांची फौज मैदानात उतरली आहे.दरम्यान, माजी आमदार लक्ष्मण पवार व बाळराजे पवार यांच्या भगीनी वृषाली या माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांचे बंधू जयसिंग पंडित यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे पवार - पंडितांचे नाते मेहुण्यांचे आहे. मात्र, आज हे दोन्ही मेहुणे एकमेकांच्या अंगावर धावून गेल्याचे पहायला मिळाले. या प्रकारानंतर अमरसिंह पंडित, आमदार विजयसिंह पंडित यांनीही संतप्त प्रतिक्रिया दिल्या. आम्ही बांगड्या भरलेल्या नाहीत, असा इशारा विजयसिंह यांनी दिला होता.

राज्यात औरंगाबाद हज हाऊसमध्ये ७ हजारांहून अधिक वक्फ मालमत्ता नोंदणीकृत

औरंगाबाद, (दिव्य न्युज):- राज्यभरातील वक्फ संपत्तीची कायदेशीर नोंदणी करण्यासाठी सुरू असलेल्या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या चार दिवसांत उम्मीद पोर्टलवर ७ हजारांहून अधिक वक्फ संपत्तीची नोंदणी पूर्ण झाल्याची माहिती महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने दिली आहे.

वक्फ अधिनियम २०२५ लागू होण्याच्या पोर्शभूमीवर शासनाने सुरू केलेल्या या डिजीटल पोर्टलमुळे मशिद, मदरसा, कब्रस्तान, औकाफ जमिनी तसेच इतर धार्मिक संपत्तीचे कायदेशीर संरक्षण आणि सरकारी नोंदींमध्ये निश्चित स्थान मिळण्यास मोठी मदत होत आहे. नोंदणी न झालेल्या संपत्तीवर कायदेशीर दावा सिद्ध करण्यात अडथळे निर्माण होऊ शकतात, त्यामुळे सर्व संपत्तीधारकांनी तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. औरंगाबाद हज हाऊसमधील शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जुनेद सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद हज हाऊस येथे डिजीटल नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मालमत्ता धारकांना तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत असून, राज्यभरातून सुरुवातीच्या चार दिवसांत विक्रमी नोंदणी झाल्याचे प्रशासनाने सांगितले. वरिष्ठ अधिकारी खान मुजम्मिल सोहेल यांनी याबाबत समाधान व्यक्त करत, येत्या ५ डिसेंबरपर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले.

१०० पेक्षा अधिक युवकांना रोजगाराची संधी

या अभियानाच्या माध्यमातून १०० हून अधिक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. समाजहितासाठी सुरू असलेल्या या मोहिमेत युवकांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसत असून, वक्फ संपत्तीचे संरक्षण अधिक शास्त्रीय आणि कायदेशीर पद्धतीने होण्यास मदत होत आहे.

पान १ वरून

काय ते निवडणूक विभाग

मत आपल्याला मिळणार नाही त्याचे चक्क बोगस मतदान कार्ड, आधार कार्ड तयार केले, सर्व प्रथम त्यांची भाडे तत्वावर आणलेले कार्यर्क्ते यामध्ये सर्वात जास्त हे महिलांची संख्या अधिक होती. त्यांनी त्यांचा मतदान करून टाकले. जेव्हा हे खरे मतदार मतदान केंद्रावर मतदान टाकण्यासाठी आले तेव्हा त्यांना त्या केंद्रातील अधिकाऱ्यांनी सांगितले की तुमचे मतदान झालेले आहे. तुम्ही पुन्हा कशाला आलात, म्हणजे हा कसला शहानपणा.... खरे मतदार मतदानापासुन वंचित राहिले आणि भाडेतत्वावर आणलेल्या कार्यकर्त्यांनी मतदान उरकून घेतले. बीड शहरालगत असलेल्या ग्रामीण भागातून अक्षरशः महिला आणि पुरूष जमा केले होते. यांनीच हा बोगसगिरीचा धिंगाना घातला. समाज बांधवांनो तुम्ही तुमच्या महिलांकडे लक्ष द्या... छोट्याश्या पैशांसाठी त्या महिलांनी आपला नवरा बद्दला, आपला बाप बद्दलला...

जेव्हा त्या मतदान अधिकाऱ्यांनी नवऱ्याचे नाव विचारले तेव्हा या नालायक महिलांनी आपल्या नवऱ्याचे नाव न घेता त्या मतदानावर असलेल्या पुरूषाचे नाव घेवून आपला नवरा हाच आहे असे ठणकावून सांगितले आता या महिला खरा नवरा कोण आता या महिलेनी याचे उत्तर देणे गरजेचे आहे. इस्लाममध्ये स्पष्टपणे सागण्यात आले आहे की लाच देणे आणि लाच घेणे हा सर्वात मोठा गुन्हा आहे. जो यामध्ये सहभागी असतील त्यांना अल्लाह हे नर्कात (जहानुममध्ये) टाकण्याचे सांगितले आहे. इथे तर खुलेआम बिनधास्तपणे आपण इस्लामचे खरे आणि पक्के बंदे आहोत असे सांगणारे खुलेआम पैशांचे वाटप करत होते. पैशांच्या बळावर मतदान विकत घेत होते. खुलेआम भाडेतत्वावर आणलेल्या कार्यर्क्त्यांकडून बोगस मतदान करून घेत होते. याची तुम्हाला थोडी तरी लाज वाटली नाही का. खरोबरच कालची निवडणू ही साध्या सोप्या लोकांसाठी कार्यर्क्त्यांसाठी राहिलेली नाही. साधारण एका उमेदवाराला ३०-४० लाखांच्या पुढेच खर्च आला आहे. एका साधारण व्यक्ती, कार्यकर्ते एवढे पैसे कोठून आणणार आता इथून पुढे असले हरामाखोर नं.२ चे धंदे करणारे तुमचे नगरसेवक असतील.... कारण, मतदारांनो तुम्ही जे पेरले तेच उगणार आहे. यामध्ये कोणाचीच चुक नाही. जे कालच्या झालेल्या निवडणूकत झाले याला फक्त आणि फक्त काही ठराविक मतदार जबाबदारी असुन इथून पुढे आपले नेते हे नं. २ चं धंदेवाले असतील यामध्य आता कोणतीच शंका राहिलेली नाही.

मतदारांसह भाजपाला सहकार्य करणाऱ्यांचे मन:पुर्वक आभार-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड (दिव्य न्युज):- बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच भारतीय जनता पक्षाने अत्यंत तुल्यबळ लढत दिली. या निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती रविंद्र घुंबरे यांच्यासह ५२ नगरसेवक पदाच्या उमेदवारांना बीडच्या जनतेने मतदानरुपी आशीर्वाद दिले. या सर्व मतदारांसह भाजपला सहकार्य करणाऱ्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी आभार मानले आहेत.

डॉ.क्षीरसागर यांनी पत्रकात पुढे म्हटले की, निवडणूक काळात राष्ट्रवादी काँग्रेसकडून अनेक ठिकाणी पैशांचे आमिष दाखविण्यात आल्याचे तसेच काही मतदान केंद्रांच्या बाहेर उमेदवारांच्या नातेवाईकांकडून पैसे वाटप झाल्याचे व्हिडिओ समोर आले. शरदचंद्र पवार गटासह काही कार्यकर्त्यांनी दडपशाही व राडा घालण्याचे प्रकार केल्याचे निदर्शनास आले. निवडणूक जाहीर झाल्यापासून काही जातीवादी पक्षांनी जात-धर्माचा मुद्दा पुढे करून भाजपला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही भाजपने विकासाचे व्हिजन, राष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा मुद्दा जनतेसमोर मांडत सकारात्मक प्रचार केला. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप नेत्या, मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड नगरपरिषदेची निवडणूक लढविण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली. या संपूर्ण प्रक्रियेत माजी मंत्री जयदत्तअण्णा क्षीरसागर यांचे खंबीर पाठबळ लाभले. पक्षाने माझ्या पत्नी डॉ.सारिका यांना प्रभाग क्र.१५ मधून निवडणूक लढविण्याची संधी दिली. तसेच, निवडणूक काळात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह भाजपच्या जिल्हा व शहर कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी खांद्याला खांदा लावून मेहनत घेतली. तसेच, भाजपला प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व संघटना, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांचे मनापासून आभार मानतो, असे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरेंना अटक करा...

प्रकाश आंबेडकरांच्या वकिलाच्या मागणीने खळबळ

मुंबई , (दिव्य न्युज):- माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विरोधात अटक वॉरंट जारी करण्यात यावे, अशी मागणी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकरांच्या वकिलाने पत्राद्वारे केली आहे. कोरेगाव भीमा आयोगासमोर उद्धव ठाकरे किंवा त्यांचा प्रतिनिधी हजर राहिला नाही, त्यामुळे त्यांच्यावर कराबाई करण्यासाठी अटक वॉरंट जारी करण्याची मागणी करण्यात आली.

कोरेगाव भीमा दंगलीच्या संदर्भात शरद पवार यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहिले होते. या पत्राची प्रत आयोगाकडून पवार यांच्याकडे मागण्यात आली होती. मात्र, ती प्रत आपल्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री ठाकरे यांनी ती प्रत द्यावी, यासाठी त्यांना नोटीस देण्यात आली होती. मात्र, ठाकरेंकडून या नोटीसीला उत्तर देण्यात आले नाही.त्यामुळे आयोगाच्या नोटीसनंतर देखील ठाकरे किंवा त्याचा प्रतिनिधी हजर राहिला नसल्याने त्यांचा विरोधात अटक वॉरंट जारी करण्यात यावे, अशी मागणी पत्राद्वारे आंबेडकरांच्या वकिलाने केली आहे.मंगळवारी (ता.२) कोरेगाव भीमा आयोगापुढे सुनावणी झाली. या सुनावणी वेळी ठाकरेंच्या वतीने कोणतेही निवेदन अथवा कागदपत्र सादर करण्यात आली नाही. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांचे वकील ॲड किरण कदम यांनी आयोगाकडे ठाकरेंच्या विरोधात अटक वॉरंट जारी करण्यासंदर्भात अर्ज केला. आयोगाने या अर्जवर अद्याप निर्णय घेतला नाही.

रियाज अहमद कागजी यांचे निधन

बीड , (दिव्य न्युज):- बीड शहरातील शाहीनशाह नगर येथील रहिवाशी तथा मिलिया माध्यमिक शाळा, धारूर येथील सहशिक्षक अयाज कागजी यांचे वडील सेवानिवृत्त प्राचार्य रियाज अहमद कागजी यांचे अल्पशा आजाराने १ डिसेंबर रोजी दुपारी राहत्या घरी निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. रियाज अहमद कागजी यांनी मिलिया शाळा, बीड येथे तब्बल ३९ वर्षे ८ महिने सेवा बजावली असून त्यापैकी ५ वर्षे मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. तसेच ते मिलिया पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. अत्यंत कर्तृत्ववान, शांत स्वभावाचे व शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, तसेच नात-नातू असा मोठा परिवार आहे. कागजी परिवाराच्या दुःखात दैनिक दिव्य वार्ता, कश्मकश परिवार सहभागी आहे.